प्रति,

संपादक,
दैनिक वृत्तपत्र, लोकमत/सार्वमत/पुढारी/पुण्यनगरी
अहमदनगर.

क्रमांक पशा कक्ष २(१) /प्रबंधक/३७७/२०१७ अहमदनगर, दिनांक: ११/०३/२०१७

विषय:- अहमदनगर जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालया करीता आवश्यक साहित्य खरेदी करणेबाबत जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

---oo--

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, दहशतवादी हल्ले,अतिरेकी कारवाया, बॉम्ब स्फोट,भिषण दंगली इत्यादींवर नियंत्रण आणण्यासाठी आणि जनतेमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी एलईडी स्क्रिन खरेदी करावयाची आहे. तसेच सदरची स्क्रिन ची उभारणी हि पोलीस वाहनामध्ये करावयाची असून त्याकरीता आवश्यक असणारे साहित्य खरेदी करण्याबाबतची जाहिरात दिनांक १२/०३/२०१७ रोजी प्रसिध्द होणारे वृत्तपत्रमध्ये प्रसिध्द करण्यात यावी व त्या बाबतचे देयक तीन प्रतीत या कार्यालयास पाठविणेस विनंती आहे.

( डॉ. सौरभ त्रिपाठी )
पोलीस अधीक्षक, अहमदनगर

# जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय,अहमदनगर

---

## " परिशिष्ठ - अ"

(खरेदी करणे प्रस्तावित असलेल्या साहित्याचा तपशिल )

१. दहशतवादी हल्ले ,अतिरेकी कारवया,बॉम्ब स्फोट,भिषण दंगली इत्यादीवर नियंत्रण आणण्यासाठी आणि जनतेमध्ये जागरुकता निर्माण करण्यातसाटी Outdoor SMD LED Display ५.०४ x ५.०४ फूट या साईजचा एलईडी स्क्रिन खरेदी करणे.

२. दहशतवादी हल्ले ,अतिरेकी कारवया,बॉम्ब स्फोट,भिषण दंगली इत्यादीवर नियंत्रण आणण्यासाठी आणि जनतेमध्ये जागरुकता निर्माण करण्यातसाटी एलईडी स्क्रिन चे पोलीस वाहनामध्ये उभारणी करणेसाठी खालील प्रमाणे साहित्य खरेदी करणे आहे.

| | |
|---|---|
| १. Sending Card | २. Receiving Card |
| ३. Amplifier | ४. Sound |
| ५. Fabrication | ६. Shutter |

परिशिष्ठ "अ" मध्ये नमूद साहित्यांची खरेदी विक्री करणा-या विक्रेत्यांना कळविण्यात येते की, अहमदनगर जिल्हा पोलीस दला करीता वर नमूद साहित्य खरेदी करणे प्रस्तावित आहेत.ज्यांचेकडे व्हॅट रजिष्ट्रेशन व व्यवसायाची इतर आवश्यक सर्व परवाना आहेत अशा विक्रेत्यांनी दिनांक १८/०३/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत त्यांचे दरत्रके सीलबंद लिफाफयात पोलीस अधीक्षक अहमदनगर यांचे कार्यालयात सादर करावे.

**<u>सर्वसाधारण सुचना :-</u>**

१. निविदा स्विकारण्याचा कालावधी : दिनांक १८/०३/२०१७ पर्यंत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यत सुटीचे दिवस वगळून

२. निविदा पाठविण्याची पध्दत : समक्ष अथवा पोष्टाव्दारे सीलबंद लिफाफयामध्ये

३. विहीत कालावधीचे नंतर प्राप्त होणा-या निविदांचा विचार केला जाणार नाही,

४. विहीत कालावधीत प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २०/०३/२०१७ रोजी दुपारी ४.०० वाजता जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय खरेदी समितीच्या बैठकीमध्ये उघडल्या जातील.

**-: नियम व अटी :-**

१. सोबत जोडलेल्या परिशिष्ठ - अ मध्ये नमुद वस्तुंची दरपत्रके सादर करु इच्छिणा-या विक्रेत्यांकडे व्यवसायाचा नोंदणी दाखला, पॅनकार्ड , व्हॅट रजिस्ट्रेशन व इतर आवश्यक प्रमाणपत्रे असणे आवश्यक आहे.

२. दरपत्रक सादर करु इच्छित असलेल्या वस्तुंची डिलरशिप वगैरे असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

३. दरपत्रक सादर करणारे विक्रेते सुक्ष्म व लघुउदयोग महामंडळाकडे नोंदणीकृत असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

४. दरपत्रक स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार जिल्हा पोलीस प्रमुख ,अहमदनगर यांचे असतील.

( डॉ. सौरभ त्रिपाठी )

पोलीस अधीक्षक,अहमदनगर